# University of Mumbai

मुंबई विद्यापीठ

क्र. युजी/ 95 /२०२०-२१

परिपत्रक :-

संदर्भ :- १) क्र. युजी/१३५/२०१५-१६ दिनांक १९ डिसेंबर, २०१५.

२) क्र. युजी/०९/२०१६-१७ दिनांक २६-०५-२०१६.

मुंबई विद्यापीठ विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था संलग्नित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य यांना असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रकानुसार क्रेडिट बेस ग्रेडिंग पध्दतीमध्ये श्रेणी सुधारणा करण्यासाठी UG/PG परिक्षाच्या कुठल्याही दोन सत्र परिक्षांना बसून श्रेणी सुधारणा करण्याची संधी विद्यार्थ्यांना देण्यात यावी असे ठरले होते.

पदवी व पदव्युत्तर Choice based अभ्यासक्रमामध्ये निकाल श्रेणी नुसार जाहिर न करता CGPA (Cumulative Grade Point Average) नुसार जाहिर केल्यामुळे परिपत्रक क्र. युजी /०९/२०१६-१७ दिनांक २६ मे २०१६ choice based अभ्यासक्रमास लागू होत नाही तरी सदर बाबतची अधिष्ठाता मंडळाच्या दिनांक ११ फेब्रुवारी २०२१ बाब क्र.९.५ पारित झालेल्या ठरावानुसार सुधारीत नियमावली तयार करण्यात आली. दिनांक २३ फेब्रुवारी २०२१ च्या विद्वत परिषदेच्या सभेत मान्यताप्राप्त निश्चित सुधारीत नियमावली खालीलप्रमाणे:-

## पदवी व पदव्युत्तर परिक्षांमध्ये CGPA/CGPI सुधारणा करण्याबाबत.

Choice based Credit and Grading system मध्ये CGPA ( Cumulative Grade Point Average)/ CGPI ( Cumulative Grade Performance Index) सुधारण्यासाठी कुठल्याही दोन सत्र परिक्षांना बसून CGPA सुधारणा करण्याची संधी विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

पदवी व पदव्युत्तर परिक्षेतील इच्छुक विद्यार्थ्याला

१. CGPA / CGPI सुधारणा करण्यासाठी कुठल्याही दोन लागोपाठच्या सत्र परिक्षेस एकाच वेळी बसुन CGPA/CGPI सुधारणा करता येईल.

२. CGPA /CGPI सुधारणा करण्यासाठी त्या त्या सत्रा अखेरच्या नियमित परिक्षेस प्रविष्ठ व्हावे लागेल, स्वतंत्र परिक्षा घेण्यात येणार नाही.

३. CGPA /CGPI सुधारणा करण्यासाठी कमाल दोन सत्र परिक्षांसाठी आपापल्या महाविद्यालयांत परिक्षेचे आवेदनपत्र भरावे. महाविद्यालय स्तरावरील परिक्षांसाठी संबंधित महाविद्यालयाने कार्यवाही करावी व विद्यापीठ स्तरावरील परिक्षांसाठी आपल्या शिफारशी सह व शुल्कासह विद्यापीठाकडे आवेदनपत्र पाठवावे.

४. CGPA /CGPI सुधारणा करण्यासाठी केवळ लेखी परिक्षेलाच प्रविष्ठ होता येईल. Internal व प्रात्यक्षिक परिक्षांमध्ये CGPA मुळ परिक्षेस जो निकाल प्राप्त झाला आहे तोच घेण्यात येईल.

५. CGPA /CGPI सुधारणा करण्यासाठी प्रविष्ठ झालेल्या परिक्षेत अपेक्षित सुधारणा न झाल्यास पूर्ण प्रकिया पुन्हा करावी लागेल.

६. CGPA /CGPI सुधारणा करण्या करता मुळ परिक्षा उत्तीर्ण झाल्यापासून पाच वर्ष पर्यंत आवेदन करता येईल.

७. CGPA /CGPI सुधारणा झाल्यास सुधारित CGPA /CGPI परिक्षा विभागास कळविण्यात यावी व त्या अनुषंगाने परिक्षा विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल.

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

.....................

विद्वत परिषद सभा ठराव क्र. ९.९, २३ फेब्रुवारी, २०२१

क्र. सुजी/ १५ /२०२०-२१

दि.१८ मार्च, २०२१

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना :-

१. संचालक, विद्यार्थी विकास मंडळ,
२. समन्वयक, विद्यापीठ संगणक केंद्र
३. परीक्षा नियंत्रक

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव